# Indian Association of Physics Teachers (IAPT)

## Maharashtra State Convention 2024 (Pune) & Conference on

## Physics Education under NEP

**January 13-14,2024**

# Certificate

*This is to certify that Prof./Dr./Mrs./Ms. Mr. Vipul Shivaji Ghemud of*

*BJS's ASC College, Wagholi*

*has delivered a plenary/invited talk /participated and presented a paper (Oral/Poster) entitled ................ in Maharashtra State IAPT Convention 2024 and Conference on Physics Education under NEP at different scales organized by Indian Association of Physics Teachers (IAPT), RC 08 Maharashtra, SRC 08C, Pune & Department of Physics, PDEA's Anantrao Pawar College, Pirangut, Pune during 13-14th January, 2024.*

| Dr. Lata Jadhav | Prof. Bharat Kangude | Dr. R.M. Shewale | Dr. Abhay Khandagale |
|---|---|---|---|
| *( Secretary, IAPT, RC 08 )* | *( President, IAPT, SRC 08C )* | *( President, IAPT ,RC 08 )* | *(Principal, Anantrao Pawar College, Pirangut)* |

ISSN NO. 2231-4342

संस्था नोंदणी क्र-१९९१/जीबीबीएसडी/४२६

त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठाण शिक्षण संस्थेचे

त्रिमूर्ती कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,त्रिमूर्ती नगर,

नेवासा फाटा,ता.नेवासा,जि.अहमदनगर

Multi Disciplinary International Research Journal Peer Reviewed January 2024 Special Issue

शोधनिबंध सग्रह २०२४

# अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद

३१ वे राष्ट्रीय अधिवेशन

दि :- १९ व २० जानेवारी २०२४

**-: प्रमुख संपादक :-**

**डॉ.अरुणा मोरे**

अध्यक्षा

अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद

**प्रकाशक**

**प्राचार्य डॉ.सी .एस.आरसुळे**

त्रिमूर्ती कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,त्रिमूर्ती नगर,

नेवासा फाटा.जि.अहमदनगर

ISSN NO. 2231-4342

# शोधनिबंध संग्रह २०२४

**Peer Reviewed**
**Multi Disciplinary International Research Journal**
**January 2024 Special Issue**

**प्रमुख संपादक**

डॉ.अरुणा मोरे

अध्यक्षा

अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद

**प्रकाशक**

**प्राचार्य डॉ.सी .एस.आरसुळे**

**त्रिमूर्ती कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,त्रिमूर्ती नगर,**

**नेवासा फाटा.जि.अहमदनगर**

**मुद्रक :–** गणेश आर्ट, अहमदनगर

आवृत्ती :- प्रथम

**दि.** :– १९/०१/२०२४

- या शोधनिबंध संग्रहात प्रकाशित झालेल्या शोधनिबंधातील मतांशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. ती मते त्या-त्या संशोधकाचीच समजावीत.

ISSN NO. 2231-4342

# अनुक्रमणिका


| अ.नं. | संशोधक | शोधनिपंबंधाचे नांव | पृष्ठ क्रं |
|---|---|---|---|
| | | - आधुनिक विभाग - | |
| १ | प्रा. डॉ. डोंगरदिवे व्हि. एम. | सुरेन्द्रनाथ बॅनर्जी यांच्या राजकीय क्षेत्रातील नैतिक मूल्यांचा अभ्यास | २-७ |
| २ | गणेश रेवणसिद्ध वाघमारे | फलटण संस्थानाधिपती मुधोजीराजे नाईक निंबाळकर (४थे) यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान | ८-१६ |
| ३ | डॉ. शर्मिला साबळे | आधुनिक इतिहासाची भूमिका आणि नवीन प्रवाह : एक अभ्यास | १७-२५ |
| ४ | प्रा.डॉ.गोकुळ निंबा पाटील | भारतीय संविधान समितीच्या कार्याचा ऐतिहासिक आढावा | २६-३० |
| ५ | डॉ. संजय गायकवाड | क्रांतिकारक व कृतिशील संत गाडगे महाराज | ३१-३७ |
| ६ | भरत केवळ आहेर | महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे स्त्री शिक्षण विषयक कार्य | ३८-४३ |
| ७ | प्रा.डॉ.बोत्रे अमोल पोपट | मणिभाई देसाई आणि उरुळी कांचन गृहरक्षक दल | ४४-४८ |
| ८ | प्रा. सतीश सावता फुले | आधुनिक कालखंडातील माणदेशाचा ऐतिहासिक दृष्टिकोनातून सामाजिक अभ्यास | ४९-५५ |
| ९ | डॉ.यशवंत चेमा गावीत | सरदार पटेल व पश्चिम खानदेशातील जनजागृती – एक अभ्यास | ५६-५९ |
| १० | डॉ. अमृत निंबा वळवी | भारतीय स्वातंत्र्य चळवळीत धुळे जिल्हयातील महिलांचे योगदान | ६०-६६ |
| ११ | प्रा. डॉ. सुभाष श्रावण धनगर | भारतीय स्वातंत्र्य लढ्यात खानदेशातील स्त्रियांचे योगदान | ६७-७३ |
| १२ | डॉ.राजाराम सोनवणे | सहकार व ग्राम विकासाचे शिल्पकार डॉ.बाबुराव बापूजी तनपुरे (दादासाहेब) | ७४-७८ |
| १३ | प्रा.डॉ. भामरे नानाजी दगा | स्वामी विवेकानंदाचे शिक्षणविषयक तत्वज्ञान | ७९-८७ |
| १४ | प्रा. डॉ. सौ. अरुणा रविंद्र वाघोले | २१ व्या शतकातीलभिडेवाडा स्मारक दीपस्तंभ ठरणारी-क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले | ८८-९६ |
| १५ | प्राचार्य डॉ. प्रशांत पी. कोठे | डॉ. पंजराबव देशमुख आणि भारत कृषक समाज | ९७-१०० |
| १६ | प्रमोद रमेश हंचाटे | इंद्रभुवन स्थापत्य कलेचा उत्कृष्ट नमुना | १०१-१०४ |
| १७ | प्रा.सुनील लक्ष्मण परदेशी | महात्मा गांधी यांचे विचार | १०५-१०९ |
| १८ | मनिषा शरद इंगळे | भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील महातमा गांधींचे योगदान | ११०-११२ |
| १९ | उर्मिला क्षिरसागर | महाराष्ट्राचा सांस्कृतिक ठेवा -लावणी | ११३-११७ |
| २० | प्रा. सरला ब्रम्हेदव चव्हाण | क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे कार्य | ११८-१२८ |
| २१ | गणेश पुनमचंद विरुटे | साने गुरुजींवर महात्मा गांधीजींचा पडलेला प्रभाव | १२९-१३२ |
| २२ | प्रा. डॉ. शितल अरविंद धरम | अहमदनगर जिल्ह्यातील कम्युनिस्ट कार्यकर्त्यांची संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील भूमिका | १३३-१३६ |
| २३ | डॉ. भूषण गोविंद फडतरे | शोधनिबंध विषय: स्थानिक इतिहासाच्या दृष्टीने हुतात्मा स्मारकांचे महत्त्व | १३७-१४३ |
| २४ | प्रा. प्रणय जाधव | भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्याचे चिकित्सक समालोचन | १४४-१४६ |
| २५ | प्रमोद मारुती जाधव | सांगली जिल्हयातील सोने चांदी गलाई व्यवसायिकांचे स्थालांतर | १४७-१५२ |
| २६ | प्रतिक बाबासाहेब सुरशे | विसाव्या शतकात महाराष्ट्रातील भिल्ल चळवळीचे योगदान | १५३-१५७ |
| २७ | किशोर नागनाथ जोगदं | उपेक्षिताचे नायक : रघुनाथ नामदेव राऊळ उर्फ भाई राऊळ | १५८-१६४ |
| २८ | मरकड श्रीराम विलास | शिक्षणमहर्षी मारुतराव घुले यांचे शिक्षणविषयक विचार व कार्य | १६५-१७२ |
| २९ | प्रा. अर्चना राजेंद्र गायकवाड | महिला सशक्तीकरणातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका | १७३-१७६ |
| ३० | प्रा. डॉ. रघुराज मुगुटराव कुरूमकर | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार | १७७-१८१ |

ISSN No. 2231-4342

# शोधनिबंध विषय: स्थानिक इतिहासाच्या दृष्टीने हुतात्मा स्मारकांचे महत्त्व

**डॉ. भूषण गोविंद फडतरे,** इतिहास विभाग प्रमुख

फोन नं .९४२३२३७७३०.

Email: bhushan.phadtare12@gmail.com

सत्र : आधुनिक विभाग

---

**प्रस्तावना :**

भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या स्मृतीची जपवणूक होण्यासाठी, ज्ञात अज्ञात क्रांतिकारकांचा प्रेरणादायी इतिहास नवीन पिढीसमोर ठेवण्यासाठी आणि स्थानिक इतिहास लेखनासाठी 'हुतात्मा स्मारके' महत्त्वाची आहेत. भारतीय पुरातत्व पुरातत्त्व विभागामार्फत सांस्कृतिक वारसा जतन करण्यासाठी ऐतिहासिक हुतात्मा स्मारके संरक्षित केल्या जातात अशा ठिकाणांना राष्ट्रीय स्मारके असे म्हणतात. या स्मारकांची देखभाल व संरक्षण हे भारत सरकारचे पुरातत्व विभागामार्फत करत आहे. तर प्रादेशिक पातळीवर हुतात्मा स्मारकांची देखभाल व त्यांचे संरक्षण त्या त्या राज्याच्या पुरातत्व विभागामार्फत केले जाते. महाराष्ट्रातील हुतात्मा स्मारके साधारणपणे चार प्रकारची दिसून येतात. १) स्वातंत्र्यपूर्वकाळात हुतात्मा झालेल्यांची स्मारके २) मराठवाडा मुक्ती संग्रामामध्ये बलिदान दिलेल्यांची स्मारके, ३) स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय सैन्य दलातील सैनिक कार्य करत असताना शहीद झालेल्या सैनिकांची स्मारके. ही सर्व स्मारके स्थानिक इतिहासाच्या दृष्टीने महत्त्वाची आहेत.

**स्थानिक इतिहास आणि हुतात्मा स्मारक :**

प्रत्येक ठिकाणाला, गावाला राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक इतिहास लाभलेला असतो. त्याचे स्वरूप जरीकमी अधिक प्रमाणात असले तरी तेथील इतिहासाचे प्रतिनिधित्व करीत असते. शिलालेख, ताम्रपट, दुर्मिळ वस्तू, मूर्ती, नाणी, शिल्पकृती, मंदिरे, लेण्या, हुतात्मा स्मारके ही वारसास्थळे स्थानिक इतिहासाची साधने आहेत. या साधनांमधून गावातील सांस्कृतिक पैलूंचा उलगडा होत असतो. स्थानिक इतिहासाच्या दृष्टीने हुतात्मा स्मारके ही मुख्यतः ज्या व्यक्तीने देशासाठी बलिदान दिलेले आहे अशा लोकांचे, विशेषतः त्यांच्या गावात हुतात्मा स्मारक उभारलेले आहेत. अशी स्मारके गाव व पंचक्रोशीतील लोकांना नेहमी प्रेरणा देणारे ठरत असतात. त्यामुळे हुतात्मा स्मारक बांधताना गावाच्या प्रवेशद्वाराजवळ, मंदिराजवळ, गावच्या दर्शनी भागात बांधली जातात. हुतात्मा स्मारक बांधण्यासाठी साधारणता ग्रामपंचायत किंवा नगरपालिका, महानगरपालिका यांच्याकडून जागा मिळाली आहे. हुतात्मा

ISSN No. 2231-4342

स्मारक बांधल्यानंतर त्याची देखभाल व संरक्षण ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, सामाजिक संस्था अशा संस्थाद्वारे केली जाते. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री बॅरिस्टर ए. आर. अंतुले यांच्या १९८० च्या दशकात हुतात्मा स्मृतीस्तंभ व स्मारक उभारणीची संकल्पना पुढे आली. महाराष्ट्रात २०६ हुतात्मा स्मारकांची उभारणी झाली. अशा हुतात्म्यांच्या स्मारकातून वैचारिक परिवर्तनाचा जागर होत आहे. राष्ट्रवादी विचाराच्या दृष्टीने आत्मनिर्भर भारतासाठी देखील हुतात्मा स्मारके महत्त्वाची आहेत. महाराष्ट्रातील जिल्ह्यानुसार हुतात्मा स्मारकांची संक्षिप्त माहिती महाराष्ट्र राज्य गॅझेटियर पुरस्कृत 'स्वातंत्र्यसमरातील महाराष्ट्राचे योगदान' या संदर्भग्रंथात प्रसिद्ध झालेली आहे. या ग्रंथामध्ये २०६ हुतात्मा स्मारकाचे ठिकाण, त्यांची देखभाल व परीक्षण करण्यासाठी निवड करण्यात आलेल्या सेवाभावी, शैक्षणिक संस्थेचे, स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव, हुतात्म्याचे नाव, गाव, तालुका, जिल्हा इत्यादींची माहिती दिलेली आहे.[१] असा हा ग्रंथ हुतात्मा स्मारकाच्या संदर्भात स्थानिक इतिहासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे.

हुतात्मा स्मारक ज्या व्यक्तीचे बांधले आहे. त्या व्यक्तीचा पराक्रम समजावून घेतला पाहिजे. कारण हुतात्मा स्मारक हे जरी सध्या दिसत असले तरी त्या स्मारक व्यक्तीचे दुर्लक्षित कार्य समाजापुढे आले पाहिजे. त्या दृष्टीने काही निवडक हुतात्मा स्मारकांचा इतिहास मांडलेला आहे.

**हुतात्मा राजगुरू स्मारक :**

हुतात्मा शिवराम हरी राजगुरू यांचा जन्म २४ ऑक्टोबर १९०८ रोजी पुणे जिल्ह्यातील खेड येथे झाला. पुणे शहरात नूतन मराठी विद्यालयात शिक्षण घेत असतानाच त्यांच्यावर लोकमान्य टिळकांच्या विचारांचा प्रभाव पडलेला होता. राजगुरू यांच्या क्रांतिकारी जडणघडणीत पुण्याचे श्रीराम बळवंत सावरगावकर व चंद्रशेखर आझाद यांचे उल्लेखनीय योगदान आहे. सावरगावकर, काशिनाथ विठ्ठल सहस्त्रबुद्धे व दत्तात्रय बळवंत करंदीकर या तिघांचा 'हिंदुस्तान सोशालिस्ट रिपब्लिकन आर्मी'शी संबंध होता. त्यांच्याशी पुढे राजगुरू यांचा संबंध आला. राजगुरू यांनी काशी, बनारसला संस्कृतचे अध्ययन केले. बौद्धिक ज्ञानाबरोबरच बलदंड शरीर संपादनेची देखील गरज आहे हे ओळखून त्यांनी अमरावतीच्या श्री हनुमान व्यायामशाळेतून शारीरिक शिक्षण घेतले. त्यानंतर राजगुरू यांचा चंद्रशेखर आजाद व भगतसिंग यांच्याशी परिचय झाला आणि ते 'हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लिकन आर्मी' या क्रांतिकारी संघटनेशी संघटित झाले. शिव वर्मा हे बंदुकीच्या नेमबाजीतील अचूकतेसाठी प्रसिद्ध होते' त्यांच्याकडून राजगुरूंना लाठी काठी, धनुष्यबाण व नेमबाजीचे मार्गदर्शन मिळाले. भगतसिंग, राजगुरू, सुखदेव, जतीनदास व चंद्रशेखर आझाद यांच्यात क्रांती कार्याबद्दल सातत्याने चर्चा होऊ लागल्या. जुलमी ब्रिटिश सत्तेबद्दल त्यांच्या मनात तिरस्काराची भावना निर्माण होत होती.

२९ ऑक्टोबर १९२८ रोजी सायमन कमिशनने लाहोरला भेट दिली. पंजाब केसरी लाला लजपतराय यांच्या नेतृत्वाखाली कमिशन पुढे शांतपणे निदर्शने सुरु होती. लाहोरचा पोलीस अधीक्षक जेम्स स्कॉट व सहायक पोलीस अधीक्षक सॉंडर्स यांनी मात्र पोलीस बळाचा वापर करीत शांत निदर्शने करणाऱ्या आंदोलकांवर लाठी हल्ला केला. पुढे १८ दिवसातच लाला लजपतराय यांचा मृत्यू झाला. सायंकाळी लाहोरच्या सभेतील जनसमुदायापुढे संदेश बंधू चित्तरंजदास यांच्या पत्नी वासंतीदेवी म्हणाल्या 'लालाजी की चिता की आग ठंडी होने के पहले ही किसी भारतीय नौजवानने इस क्रूरता का बदला लेना चाहिए'[२] याचा परिणाम क्रांतीकारकांवर झाला.

हुतात्मा भगतसिंग, राजगुरू, चंद्रशेखर आझाद आणि जयगोपाळ यांनी लालाजींच्या मृत्यूस जबाबदार असणाऱ्या जेम्स स्कॉट अधिकाऱ्याचा खून करण्याची जबाबदारी घेतली. मालरोड पोलीस स्टेशनच्या फाटकाजवळ जयगोपाळ दबा धरून बसले. काही अंतरावर भगतसिंग व राजगुरू पिस्तुलासह सज्ज होते. पोलीस कार्यालयातून गोरा अधिकारी बाहेर पडला तात्काळ जयगोपाळने भगतसिंग यांना इशारा करताच त्यांच्या जवळ असणाऱ्या राजगुरू यांनी पहिली गोळी सॉंडर्सवर झाडली.[३] त्यानंतर भगतसिंगानेही आठ गोळया झाडल्या. या दोघांचा पाठलाग करणाऱ्या हेड कॉन्स्टेबल छगनसिंगवर चंद्रशेखर आझाद यांनी गोळया झाडल्या त्यामध्ये तो ज़खमी झाला.

लाहोरमध्ये धरपकड सत्र सुरू झाल्याने राजगुरू हे गुप्तपणे पुणे शहरात आले. राजगुरू पुण्यामध्ये आल्यानंतरही त्यांच्यातील क्रांतीकार्याचे नवचैतन्य ज्वलंत होते. पुण्याच्या रेस कोर्स मैदानावरील घोड्यांच्या शर्यत स्पर्धेचे बक्षीस वितरणासाठी येणारे मुंबईचे गव्हर्नर फ्रेडरिक साईक्सचा वध करण्याची योजना तयार केली. लाहोरच्या पोलिसांनी माफीचे साक्षीदार झालेल्या जय गोपाळला पुण्यात आणले होते. राजगुरूंना अटक करून फरासखाना पोलीस स्टेशनला नेले. पुढील चौकशीसाठी त्यांना लाहोरला घेऊन गेले. मध्यंतरीच्या काळात भगतसिंग, बुटकेश्वर दत्त, सुखदेव यांनाही अटक झालेली होती. राजगुरूसह या सर्व क्रांतिकारकांवर खटला भरला तोच 'लाहोर केस खटला' होय. या खटल्याचा निकाल लागून २३ मार्च १९३१ रोजी शिवराम हरी राजगुरू यांच्यासह भगतसिंग व सुखदेव यांना लाहोरच्या तुरुंगात फाशी देण्यात आले.[४] यावेळी राजगुरू हे फक्त २२ वर्षांचे होते. ऐनतारुण्यात देशाच्या स्वातंत्र्यासाठी 'इन्कलाब जिंदाबाद' अशा घोषणा देत शिवराम हरी राजगुरू हुतात्मा झाले.

हुतात्मा शिवराम हरी राजगुरू यांचे स्मारक राजगुरुनगर खेड येथे आहे. हे स्मारक व त्यांचा वाडा या दोन्ही ऐतिहासिक वास्तू महाराष्ट्र शासनाने संरक्षित स्मारक म्हणून घोषित केल्या आहेत. पुणे पुरातत्त्व विभागाद्वारे हुतात्मा स्मारक व वाडा या दोन्ही वास्तूंचे जतन व दुरुस्तीचे काम केल्यामुळे आता

या स्मारकाला गतवैभव मिळाले आहे. येथील स्मारकाची देखभाल व स्वच्छता ही राजगुरुनगरनगर परिषदेमार्फत केली जाते. हुतात्मा शिवराम हरि राजगुरु यांची पुण्यतिथी २३ मार्च व जयंती २४ ऑगस्ट या दोन्ही दिवशी हुतात्मा स्मारक व वाडा येथे पुणे अभिलेखागार व राजगुरुनगर परिषदेच्या वतीने कार्यक्रम आयोजित केले जातात. या दोन्ही दिवशी मोठ्या प्रमाणात शासकीय अधिकारी व राजगुरुनगर पंचक्रोशीतील जनसमुदाय हुतात्मा स्मारकास भेट देतात.

**चिरनेर हुतात्मा स्मारक :**

रायगड जिल्यातील उरण तालुक्यातील चिरनेर येथे हुतात्मा स्मारक आहे. देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढल्या गेलेल्या चिरनेर जंगल सत्याग्रहाला विशेष महत्व आहे. महात्मा गांधीजींनी पुकारलेल्या सविनय कायदेभंग आंदोलनात मिठाचा सत्याग्रह व जंगल सत्याग्रह हे दोन्ही सत्याग्रह विशेष गाजले आहेत. ब्रिटिश सरकारने आदिवासींचा जंगलावरील हक्क नाकारला. या अन्याया विरोधात देशभर जंगल सत्याग्रह सुरू झाले. देशातील पहिला जंगल सत्याग्रह सांगली जिल्ह्यातील शिराळा तालुक्यातील बिळाशी येथे झाला. यानंतर रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील चिरनेर येथे जंगल सत्याग्रह झाला. दिनांक २५ सप्टेंबर १९३० रोजी ५ हजार लोकांनी चिरनेरमधील अक्कादेवीच्या डोंगरावर 'महात्मा गांधी की जय' अशा घोषणा देत शांततेच्या मार्गाने गवत कापत जंगल सत्याग्रह सुरू झाला.[६] पोलिसांनी वीस सत्याग्रहींना पकडून बेड्या ठोकल्या. लोकांनी बेड्या काढण्याचा आग्रह केला. पण पोलीस सब इन्स्पेक्टर रामचंद्र पाटील यांनी मात्र त्यास नकार दिला. परंतु मामलेदार केशव जोशी यांनी लोकांच्या बेड्या काढण्यास सांगितले. तेव्हा पोलीस अधिकाऱ्यांनी बेड्या काढल्या. सत्याग्रहासाठी जमलेले सर्व आदिवासी लोकांचा जमाव डोंगरावरून खाली उतरत असतानाच त्यांच्यावर पोलिसांनी बेछूट गोळीबार केला. गोळीबारामध्ये आंदोलकांसह एकूण १३ जण हुतात्मा झाले.

चिरनेर आंदोलनामधील हुतात्म्यांची नावे[७] – १) परशुराम रामा पाटील (पाणदिवे), २) धाकू गवत्या फोफरकर (चिरनेर) ३) रघुनाथ मोरेश्वर न्हावी (कोपोर्ली) ४) रामा बामा कोळी (मोठी जुई) ५) आनंदा माया पाटील (धाकटी जुई), ६) हसुराम बुधाजी घरत (खोपटे) ७) नाग्या महादू कातकरी (चिरनेर) ८) आलू बेमट्या म्हात्रे (दिघोडे) ९) नारायण पांडू कदम (पनवेल) १०) हरी नारायण तवटे, ११. जयराम बाबाजी सावंत १२.काशिनाथ जनार्दन शेवडे १३. केशव महादेव जोशी मामलेदार. या घटनेचे पडसाद संपूर्ण देशभर उमटले.

चिरनेर जंगल सत्याग्रहातील आदिवासी सत्याग्रही हुतात्म्यांच्या स्मृति प्रीत्यर्थ चिरनेरमध्ये स्तंभ उभारला. या स्तंभाला कोणशीला कनैयालाल मुन्शी यांच्या हस्ते २५ सप्टेंबर १९३१ रोजी बसविण्यात आली. ३ जानेवारी १९३२ रोजी चिरनेर स्तंभाचे उद्धाटन झाले. चिरनेरचा स्तंभ हा

या स्मारकाला गतवैभव मिळाले आहे. येथील स्मारकाची देखभाल व स्वच्छता ही राजगुरुनगरनगर परिषदेमार्फत केली जाते. हुतात्मा शिवराम हरि राजगुरु यांची पुण्यतिथी २३ मार्च व जयंती २४ ऑगस्ट या दोन्ही दिवशी हुतात्मा स्मारक व वाडा येथे पुणे अभिलेखागार व राजगुरुनगर परिषदेच्या वतीने कार्यक्रम आयोजित केले जातात. या दोन्ही दिवशी मोठ्या प्रमाणात शासकीय अधिकारी व राजगुरुनगर पंचक्रोशीतील जनसमुदाय हुतात्मा स्मारकास भेट देतात.

**चिरनेर हुतात्मा स्मारक :**

रायगड जिल्यातील उरण तालुक्यातील चिरनेर येथे हुतात्मा स्मारक आहे. देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढल्या गेलेल्या चिरनेर जंगल सत्याग्रहाला विशेष महत्व आहे. महात्मा गांधीजींनी पुकारलेल्या सविनय कायदेभंग आंदोलनात मिठाचा सत्याग्रह व जंगल सत्याग्रह हे दोन्ही सत्याग्रह विशेष गाजले आहेत. ब्रिटिश सरकारने आदिवासींचा जंगलावरील हक्क नाकारला. या अन्याया विरोधात देशभर जंगल सत्याग्रह सुरू झाले. देशातील पहिला जंगल सत्याग्रह सांगली जिल्ह्यातील शिराळा तालुक्यातील बिळाशी येथे झाला. यानंतर रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील चिरनेर येथे जंगल सत्याग्रह झाला. दिनांक २५ सप्टेंबर १९३० रोजी ५ हजार लोकांनी चिरनेरमधील अक्कादेवीच्या डोंगरावर 'महात्मा गांधी की जय' अशा घोषणा देत शांततेच्या मार्गाने गवत कापत जंगल सत्याग्रह सुरू झाला.[६] पोलिसांनी वीस सत्याग्रहींना पकडून बेड्या ठोकल्या. लोकांनी बेड्या काढण्याचा आग्रह केला. पण पोलीस सब इन्स्पेक्टर रामचंद्र पाटील यांनी मात्र त्यास नकार दिला. परंतु मामलेदार केशव जोशी यांनी लोकांच्या बेड्या काढण्यास सांगितले. तेव्हा पोलीस अधिकाऱ्यांनी बेड्या काढल्या. सत्याग्रहासाठी जमलेले सर्व आदिवासी लोकांचा जमाव डोंगरावरून खाली उतरत असतानाच त्यांच्यावर पोलिसांनी बेछूट गोळीबार केला. गोळीबारामध्ये आंदोलकांसह एकूण १३ जण हुतात्मा झाले.

चिरनेर आंदोलनामधील हुतात्म्यांची नावे[७] – १) परशुराम रामा पाटील (पाणदिवे), २) धाकू गवत्या फोफरकर (चिरनेर) ३) रघुनाथ मोरेश्वर न्हावी (कोपोर्ली) ४) रामा बामा कोळी (मोठी जुई) ५) आनंदा माया पाटील (धाकटी जुई), ६) हसुराम बुधाजी घरत (खोपटे) ७) नाग्या महादू कातकरी (चिरनेर) ८) आलू बेमट्या म्हात्रे (दिघोडे) ९) नारायण पांडू कदम (पनवेल) १०) हरी नारायण तवटे, ११. जयराम बाबाजी सावंत १२.काशिनाथ जनार्दन शेवडे १३. केशव महादेव जोशी मामलेदार. या घटनेचे पडसाद संपूर्ण देशभर उमटले.

चिरनेर जंगल सत्याग्रहातील आदिवासी सत्याग्रही हुतात्म्यांच्या स्मृति प्रीत्यर्थ चिरनेरमध्ये स्तंभ उभारला. या स्तंभाला कोणशीला कनैयालाल मुन्शी यांच्या हस्ते २५ सप्टेंबर १९३१ रोजी बसविण्यात आली. ३ जानेवारी १९३२ रोजी चिरनेर स्तंभाचे उद्घाटन झाले. चिरनेरचा स्तंभ हा

बेकायदेशीरपणे बांधला असल्याचे कारण देत रायगडच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशान्वये हा स्तंभ जून १९३२ मध्ये पाडण्यात आला. असे असले तरी चिरनेर मधील स्तंभामुळे आदिवासी लोकांना प्रेरणा मिळत ब्रिटिश पोलीस व सरकार बद्दल असणारी तिरस्काराची भावना वाढत होती. अशी भावना कृतीतून व्यक्त होण्यापूर्वीच स्तंभ पाडला असला पाहिजे. सन १९३७ मध्ये प्रांतिक काँग्रेसच्या मंत्रिमंडळाने पुन्हा स्तंभ उभारण्याचा निर्णय घेतला. वर्षभरात पुन्हा चिरनेरमधील स्तंभाचे बांधकाम पूर्ण झाले. मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांच्या हस्ते ३ जानेवारी १९३९ रोजी येथील स्तंभाचे अनावरण झाले. अशा ऐतिहासिक स्तंभाच्या चारही दिशेला 'वंदे मातरम्' अशा पाट्या लावलेल्या आहेत.[८] १९८० च्या दशकात चिरनेर येथे हुतात्मा स्मारक उभारण्यात आले. हुतात्मा स्मारकाच्या शेजारी हुतात्मा स्मारक शिल्प उभारण्यात आली आहेत. चिरनेरप्रमाणेच दिगोडे, मोठी जुई, धाकटी जुई, कोप्रोली, पानदिवे आणि खोपटे इत्यादी गावातही हुतात्मा स्मारके उभारण्यात आली आहेत. या सर्व गावांमधील सत्याग्रही चिरनेरच्या जंगल सत्याग्रहात हुतात्मा झालेले आहेत. २५ सप्टेंबर या दिवशी हुतात्मा स्मारकावर शासनाच्यावतीने मानवंदना दिली जाते. याप्रसंगी चिरनेर व परिसरातील आदिवासी बाल-वृद्ध, स्त्री-पुरुष, शेतकरी-कामगार असे सर्वजण मोठ्या संख्येने उपस्थित राहतात.

**हुतात्मा मेजर प्रदीप ताथवडे स्मारक**

प्रदीप रामचंद्र ताथवडे यांचा जन्म २१ सप्टेंबर १९६३ रोजी झाला. त्याचे मूळ गाव पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील केंदूर आहे. प्रदीप यांना सैनिकी शिक्षणाचा वारसा आई कुसुमताई घनवट यांच्या कुटुंबापासून मिळालेला होता. प्रदीप यांचे आजोबा कोंडाजीराव घनवट यांनी पहिल्या महायुद्धात, मामा लेफ्टनंट मार्तंडराव यांनी दुसऱ्या महायुद्धात तर दुसरे मामा कॅप्टन शिवाजीराव यांनी १९७१ च्या युद्धात अतुलनीय पराक्रम केला. त्यांच्या शौर्याची, पराक्रमाची माहिती प्रदीप यांना बालपणापासूनच मिळत होती. प्रदीप यांनी सातारा येथील सैनिकी स्कूल व पुणे येथील राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (एनडीए) या संस्थांमधून लष्करी शिक्षण घेतले. लष्करी शिक्षण घेतल्यानंतर प्रदीप ताथवडे हे भारतीय लष्करातील 'लाईट ८ जम्मू काश्मीर इन्फंट्री बटालियन'मध्ये सहभागी झाले.[९] ही बटालियन मुख्यत: पाकिस्तानच्या सैन्याशी कडवी झुंज देण्यासाठी प्रसिद्ध आहे. सियाचिनच्या बर्फाळ भागातील बिला फोंडला खिंड रोखून धरण्यात अग्रेसर होती. येथील जबाबदारी मेजर प्रदीप ताथवडे यांच्यावर होती. या खिंडीपासूनच असणाऱ्या ३ किलोमीटर अंतरावर कैद पोस्ट आहे. या ठिकाणावरून पाकिस्तानी सैन्य भारतीय लष्करावर गोळीबार करत. तेव्हा हे ठिकाण भारतीयांच्या ताब्यात असणे अतिशय महत्त्वाचे आहे हे ओळखून मेजर प्रदीप यांची कैद पोस्टवर निवड झाली. मेजर प्रदीप ताथवडे व पाकिस्तानी सैन्य यांच्यात गोळीबार सुरु झाला. पण भारतीय सैन्यापुढे शत्रूला माघार घ्यावी लागली. कैद पोस्ट भारताच्या

ISSN No. 2231-4342

नियंत्रणाखाली आल्याने पाकिस्तानकडून भारतावर होणारा लष्करी मारा कमी झाला. कैद पोस्टवरील पराक्रम पाहून मेजर प्रदीप यांची भीम पोस्टवर देशसेवा केली.

सन १९९९ मध्ये भारत-पाकिस्तान यांच्यात कारगिल युद्ध झाले. या युद्धाच्या प्रसंगी मेजर प्रदीप हे १२० सैन्यानिशी दोडा पोस्टवर होते. कारगिल युद्धाच्या वेळी पाकिस्तानी सैन्याने दोडावर अनेक हल्ले केले. परंतु तेवढ्याच प्रतिकाराने मेजर प्रदीप यांनी देखील ते परतावून लावले व दोडाचा कोणताही भाग पाकिस्तानला घेऊ दिला नाही. कारगिल युद्धात अपयश आल्याने पाकिस्तानी अतिरेकी जम्मू-काश्मीरच्या परिसरात घुसखोरी करू लागले. पूँछजवळील शहापूर गावाजवळील सिलोनिया गावात अतिरेकी आश्रयास येणार ही खबर मेजर प्रदीप यांना मिळाली. तेव्हा मेजर प्रदीप व मेजर हिमांशू सावंत यांनी २० ते ३० सैन्यानिशी २६ नोव्हेंबर १९९९ च्या रात्री सिलोनिया गावाला गुप्त वेढा दिला. अतिरेकी गावात प्रवेश करताच त्यांच्यावर गोळीबार झाला. तेथील गोळीबारात 'हरकत उल मुजाहिदीन' या अतिरेकी संघटनेचा चीफ एरिया लान्स कमांडर मारला गेला.[१०] या घटनेचा बदला घेण्यासाठी अनेक अतिरेक्यांनी हालचाली सुरू केल्या.

शहापूर, सिलोनियाप्रमाणे पिंडी गावातही अतिरेक्यांनी आश्रय घेतला होता. १५ जून २००० रोजी मेजर प्रदीप ताथवडे, मेजर यशपाल राणा आणि मेजर हिमांशू सावंत हे निवडक सैन्यानिशी पिंडीकडे गेले. १६ जूनच्या रात्री मेजर मेजर हिमांशू सावंत यांनी पिंडी गावाला वेढा दिला. पिंडीजवळील दोडागावातही ५ अतिरेक्यांनी आश्रय घेतला होता. दोडाची जबाबदारी स्वतः मेजर प्रदीप ताथवडे यांनी घेतली. दोडा येथील अतिरेक्यांशी लढता लढता मेजर प्रदीप तातवडे १६ जून २००० रोजी धारातीर्थी पडले. पण तेथील पाचही अतिरेकी मारण्यात मेजर प्रदीप ताथवडे यशस्वी झाले होते. मातृभूमीसाठी प्राणाची बाजी लावणारे मेजर प्रदीप ताथवडे हे हुतात्मा झाले. शहीद मेजर प्रदीप ताथवडे यांना कीर्ती चक्र मरणोत्तर मिळाले.

शहीद मेजर प्रदीप ताथवडे यांच्या कार्याचे स्मरण होण्यासाठी त्यांच्या मूळ गावी केंदूर येथे शहीद मेजर प्रदीप ताथवडे हुतात्मा स्मारक बांधण्यात आले. स्मारकासाठी केंदूर ग्रामपंचायतकडून जागा मिळाली असून तेथे मेजर प्रदीप ताथवडे यांचा अर्ध पुतळा उभारला आहे. येथील हुतात्मा स्मारकाची देखभाल केंदूर ग्रामपंचायत व शहीद मेजर प्रदीप ताथवडे प्रतिष्ठान तर्फे केली जाते. शहीद मेजर प्रदीप ताथवडे स्मारकापासून केंदूर परिसरातील अनेक तरुणांना भारतीय सैन्य दलात जाण्याची प्रेरणा मिळत आहेत त्यामुळे केंदूर, पाबळ, धामारी, खैरेनगर या गावातील अनेक तरुण भारतीय सैन्य दलात कार्यरत आहेत. तर कित्येक जण निवृत्त होऊन स्थानिक तरुणांना देशसेवेबद्दलचे मार्गदर्शन करीत आहेत.

**मूल्यमापन :** भारतीय स्वातंत्र्यलढ्यात व स्वातंत्र्योत्तर काळात शत्रूंची लढा देत असताना बलिदान झालेल्या वीरांचे व त्यांच्या कार्याचे स्मरण होण्यासाठी हुतात्मा स्मारक व स्तंभ उभारलेले आहेत. स्थानिक इतिहासाच्या दृष्टीने हुतात्मा स्मारक व स्तंभ हे अत्यंत महत्त्वाचे आहे. हुतात्मा स्मारक व स्तंभापासून आजच्या तरुणांना राष्ट्रसेवेची प्रेरणा मिळण्यास मदत होते. तसेच हुतात्मा स्मारक व स्तंभ हे राष्ट्रीय एकात्मतेचे देखील प्रतीक आहेत. येथे शासनाच्या वतीने घेतल्या जाणाऱ्या कार्यक्रमाला गावातील बाल-वृद्ध, स्त्रिया-पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित राहतात.

**संदर्भ व टिपा**


१. डॉ. दि.प्र. बलसेकर (कार्यकारी संपादक), स्वातंत्र्यसमरातील महाराष्ट्राचे योगदान, दर्शनीक विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, २०२२, पृ.क्र. १२९ ते १७४.

२. दीपाकांत राक्षे, हुतात्मा शिवराम राजगुरू, हुतात्मा राजगुरू प्रकाशन समिती, राजगुरुनगर, १९९९, पृ.क्र. २६२.

३. कित्ता, पृ.क्र. २६९.

४. शांतीलाल भंडारी, क्रांतीपर्व, सुमेरू प्रकाशन, डोंबिवली, २००२, पृ.क्र.२६०.

५. पूर्वोक्त, डॉ. दि.प्र. बलसेकर (कार्यकारी संपादक), पृ.क्र. १९९.

६. K.K.CHAUDHARI (ED.), CIVIL BISOBEDIENCE MOVEMENT, April-September 1930, Vol. XI, Gazeeteers Department, Govt. of Maharashtra, Bombay, 1990, P. 565.

७. डॉ. बबन भीमसेन जाधव, रायगड जिल्ह्यातील स्वातंत्र्य चळवळ शेतकऱ्यांचा सहभाग, लक्ष्मी बुक पब्लिकेशन, सोलापूर, २०१४, पृ.क्र. १९७.

८. कित्ता, पृ.क्र. २०८.

९. सुभाष चंद्र जाधव, अमर योद्धा, शहीद मेजर प्रदीप ताथवडे प्रतिष्ठान, पुणे, २००२, पृ.क्र. ५२.

१०. कित्ता, पृ.क्र. ९४.

११. कित्ता, पृ.क्र. १०१.

सावित्रीबाई फुले पुणे विश्वविद्यालय पुणे,
हिंदी अध्ययन मंडल

अहमदनगर जिला मराठा विद्या प्रसारक समाजका

ESTD - June 1978

# न्यू आर्टस्, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज, शेवगाव

के संयुक्त तत्वावधान में आयोजित

## स्नातक (प्रथम वर्ष हिंदी) पाठ्यक्रम पुनर्गठन
## एक दिवसीय कार्यशाला

09 जनवरी, 2024

# प्रमाणपत्र

प्रमाणित किया जाता है कि श्री/सुश्री/ डॉ/प्रो. सिद्धेश्वर वि. गायकवाड ने सावित्रीबाई फुले पुणे विश्वविद्यालय पुणे, हिंदी अध्ययन मंडल एवं महाविद्यालय के संयुक्त तत्वावधान में आयोजित **स्नातक (प्रथम वर्ष हिंदी) पाठ्यक्रम पुनर्गठन कार्यशाला** में सक्रिय सहयोग दिया। एतदर्थ यह प्रमाणपत्र दिया जाता है।

| डॉ. गोकुळ क्षीरसागर | डॉ.पुरुषोत्तम कुंदे | प्रो.डॉ. सदानंद भोसले |
|---|---|---|
| संयोजक एवं हिंदी विभाग प्रमुख | प्राचार्य | समन्वयक, हिंदी अध्ययन मंडल , सावित्रीबाई फुले पुणे विश्वविद्यालय पुणे |